# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २८७- २३** **दिनांक :- २९/०८/२०२३.**

## चोरी करण्याऱ्यास अटक करुन १२ मोबाईल हस्तगत, काशिमिरा पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटिकरण पथकाची कामगीरी

काशिमिरा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात फर्यादी श्री अनिल अंगत प्रजापती वय-२९ वर्षे रा- माशाचा पाडा, काशिगाव, मिरारोड, ठाणे हे त्यांचा वापरत असलेला काळया रंगाचा सॅमसंग कंपनीचा ए-०३ कोर मोबाइल फोन किं.अ.रुपये-५०००/-हा रात्री घरातील खिडकीमध्ये चार्जिगसाठी लावुन राहते घरी झोपले असता त्यांचा मोबाईल फोन कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करुन नेला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि क्र. ६११/२०२३ भा.द.वि.कलम ३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे तपास सुरु केला असता गुन्हयाच्या घटनास्थळाचे आजुबाजुचे उपलब्ध सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज तपासुन सदर फुटेजच्या आधारे गुन्हयाचा तपास करीत असताना गुप्त बातमीदाररामार्फत मिळालेल माहीतीच्या आधारे सदर गुन्हयतील संशयित आरोपी हा आतिश सिंग रा-दहीसर, मुंबई डाचकुलपाडा येथे फिरत असताना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता त्यांनी सदर गुन्हा त्याने केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्याला दि.२६/०८/२०२३ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

सदर आरोपी याचाकडे पोलीस कोठडी दरम्यान आरोपी याचाकडे कौशल्यपुर्ण तपास करुन त्याने फिर्यादी यांचा चोरी केलेला काळया रंगाचा सॅमसंग कंपनीचा ए-०३ कोर मोबाइल फोन किं.अ.रुपये-५०००/- व इतर ११ असे एकुन-१२ मोबाईल फोन अंदाजे ४६,५००/- एवढया किंमतीचे मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, महेश तरडे, श्री.सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली संदिप कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलीस ठाणे, समीर शेख, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स.पो.नि.योगेश काळे, पो.उप.निरी.शिवाजी खाडे, स.फौ.अनिल पवार, पो.हवा. दिपक वारे, प्रताप पाचुंदे, अक्षय पाटील, राहुल सोनकांबळे, निलेश शिंदे, स्वप्निल मोहीले, निकम, पो.अं. रवी कांबळे, प्रविण टोबरे, किरण विरकर, राजेंद्र सुर्यवंशी यांनी पार पाडली

---ooo---